ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– III (Special Issue – I) May – June, 2025

OPEN ACCESS Original Research Article

# कला एकात्मिक शिक्षण

* सौ.संगिता सोमनाथ लंघे व **डॉ. प्रतिमा मिश्रा

* डॉ.पी.ए. इनामदार युनिव्हर्सिटी पुणे.

**प्रस्तावना व संकल्पना:**

शाळेत प्रवेश घेतलेल्या प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास करण्याचा शाळा प्रयत्न करत असते.विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास,शारीरिक विकास व मानसिक विकास करण्यासाठी शाळेमध्ये अनेक उपक्रमांचे आयोजन व नियोजन केले जाते. शाळेत शिक्षणात पोषक वातावरण निर्माण केले जाते.त्यामध्ये वेगवेगळया शिक्षण प्रणालींचा अवलंब केला जातो.त्यातीलच एक प्रणाली म्हणजे कला एकात्मिक शिक्षण होय.

कला एकात्मिक शिक्षण (Art-Integrated Learning) ही शिक्षणप्रणाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करते. प्राथमिक शिक्षणाचे दोन टप्पे आहेत .एक प्राथमिक व दुसरा उच्च प्राथमिक टप्पा.उच्च प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यामध्ये इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांचा समावेश होतो.या उच्च प्राथमिक शिक्षणाच्या टप्प्यावर, विशेषतः इयत्ता सहावीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासाचे वेगवेगळे टप्पे असतात.हे जरी सत्य असले तरी सर्वांना समावेशक सर्वांच्या आवडीच्यातसेच आनंददायी पद्धतीने सर्वांचा विकास करणाऱ्या काही बाबींचा समावेश शिक्षण प्रणाली मध्ये करावा लागतो.सर्वसाधारणपणे प्रत्येकाला कोणती न कोणती कला अवगत असते व आवडत असते .त्यामुळे शिक्षणामध्ये कलेचा वापर केल्यास अध्ययन अध्यापन प्रक्रिया आनंददायी होऊन प्रभावी होईल व होत आहे याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे . कलेचा उपयोग केल्यास ते अधिक प्रभावी आणि आनंददायी ठरते.प्राथमिक शिक्षक म्हणून काम करत असताना कलेचा वापर मी मराठी विषयाचे अध्यापन करताना केला आहे.

**Copyright © 2025 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**कला एकात्मिक शिक्षण म्हणजे काय?**

कला एकात्मिक शिक्षण म्हणजे भाषा गणित इंग्रजी विज्ञान यासारखे विषयांच्या अध्यापन करताना विविध कला प्रकारांचा उपयोग करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ व आनंददायी करणे होय .उदाहरणार्थ विज्ञान विशेष शिकवत असताना शरीराचे वेगवेगळे भाग दाखविताना रांगोळीच्या माध्यमातून ते दाखविताना प्रत्यक्ष रांगोळी काढली तर विद्यार्थ्यांना रांगोळी काढण्याचाही आनंद मिळतो व शरीराचे अवयव प्रत्यक्ष कसे असतात याचाही अभ्यास करता येतो .यासाठी आपण चित्रकलेचाही वापर करू शकतो .म्हणजेच

एखादा घटक घेत असताना त्या घटकासाठी आपण वेगवेगळ्या कलांचा वापर करून विद्यार्थ्यांना संकल्पना समजावून देऊ शकतो व किचकट वाटणारा भाग विद्यार्थ्यांना सहजरीत्या समजू शकतो.

यामध्ये विद्यार्थ्यांना विविध कला-प्रकारांद्वारे (चित्रकला, संगीत, नाट्य, हस्तकला, इ.) शैक्षणिक विषय शिकवले जातात.यात अनुभवाधारित व सर्जनशील शिक्षणाला प्रोत्साहन दिले जाते.हे शिक्षण कृतीवर आधारित असते, जे मुलांमध्ये संकल्पनांची समज वाढवते.

**कला एकात्मिक शिक्षणाची गरज व पार्श्वभूमी:**

भारतीय शिक्षणपद्धतीत पारंपारिक दृष्टिकोन प्रबळ असून, त्या पद्धतीत पुस्तक, पाठ व परिक्षा यावर भर दिला जातो.पाठांतर पद्धतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत नाही.पाठांतर पद्धतीचा वापर करून परीक्षेत मार्क मिळवणे हाच शिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर राहत आहे .त्याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होताना दिसून येतो.विद्यार्थी एकलकोंडे होत आहेत.त्याचा परिणाम विद्यार्थ्यांचा एकमेकांबरोबर होणारा संवाद कमी झाला असून,एकमेकांच्या भावना विद्यार्थ्यांना समजून घेता येत नाहीत.

प्रत्यक्षात पाहिले तर मुलांचा नैसर्गिक कल "करून शिकण्याकडे" (learning by doing) असतो. हे लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये कला एकात्मिक शिक्षणाला महत्त्व दिले गेले आहे.या शिक्षणपद्धतीमुळे:शिक्षण आनंददायी होते.विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो.विषय समजण्याची क्षमता सुधारते.संवेदनशीलता आणि सहकार्य भावना वाढते .त्याचा प्रत्यक्ष अनुभव मला विद्यार्थ्यांना काव्यलेखन कौशल्य वाढविताना आला.

**कला एकात्मिक शिक्षणाची वैशिष्ट्ये व तत्त्वे:**

**अनुभवाधारित शिक्षण:** कृतीतून संकल्पनांची समज वाढते.

**एकात्मिक दृष्टीकोन**: विविध विषयांमध्ये कला एकत्र केली जाते.

**विद्यार्थीकेंद्री पद्धत:** विद्यार्थी केंद्रस्थानी असतो.

सर्जनशीलता व नवचैतन्य: कल्पक विचारांना वाव मिळतो.

**सर्वांगीण विकास:** केवळ बौद्धिक नव्हे तर सामाजिक, भावनिक व शारीरिक विकास.

**सहकार्य वृत्ती:** एकमेकांना सहकार्य करण्याची वृत्ती जोपासली जाते.

**इयत्ता सहावीतील विषयांमध्ये कला एकात्मिक शिक्षणाचा उपयोग :**

इयत्ता सहावीच्या वर्गामध्ये मी कला एकात्मिक शिक्षणाचा प्रत्यक्ष उपयोग केला आहे. पाठ्यपुस्तकातील कविता वाचन,गायन व स्पष्टीकरण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्या कवितेशी साधर्म्य असणारा एखादा विषय देऊन दुसरी कविता लिहिण्यास सांगितले जाते.काय लेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले जाते.विद्यार्थी स्वतःला समजलेल्या विषयावर व त्याविषयानुरूप त्याच्याकडे असलेल्या शब्दसाठ्यावर आधारित स्वतःच्या अनुभवाने काव्य लेखन करतो व त्याचे सादरीकरण वर्गामध्ये घेतले जाते. त्याचा परिणाम विद्यार्थी इतरांच्या ही कविता ऐकतात. इतरांचे विचार त्यांना ऐकायला मिळतात. स्वतःचे विचार इतरांपुढे मांडता येतात. स्वतःच्या भावना कवितेतून व्यक्त करता येतात.इतरांचे विचार ऐकत असताना इतरांबद्दल सहानुभूती निर्माण होते.एकमेकांच्या

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XIV, Issues– III (Special Issue – I) May – June, 2025
OPEN ACCESS Original Research Article

विचारात असलेले साम्य ते शोधतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची एकमेकांबद्दल आपुलकी वाढीस लागते. शब्दसंग्रह वाढतो. काव्य लेखन कसे असावे याबाबत समज निर्माण होते. त्यासाठी वाचन आवश्यक आहे हे त्याला समजते. त्यामुळे त्याला वाचन करण्याची आवड निर्माण होते. स्वतः केलेल्या नवनिर्मितीचा आनंद होतो.अभ्यासाची आवड निर्माण होते व अध्ययन अध्यापन प्रक्रिया सहज सुलभ व आनंददायी होते व विद्यार्थी विकास होण्यास मदत होते.

अशाच प्रकारे इतरही कलांचा वापर पुढील प्रमाणे आपण वेगवेगळ्या विषयांमध्ये करू शकतो त्याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे -

**१. मराठी:**

उपक्रम: कविता वाचनानंतर विद्यार्थ्यांना त्यावर आधारित चित्र काढायला सांगणे.

फायदा: भाषेची समज, अभिव्यक्ती कौशल्य व सर्जनशीलता वाढते.

**२. गणित:**

उपक्रम: आकृती-प्रमाणे मंडळ तयार करून संख्यांचे रंगीत कोडिंग.

फायदा: संख्यांची ओळख सोपी होते, गणिताची भीती कमी होते.

**३.विज्ञान:**

उपक्रम: पाणी साचण्याच्या प्रक्रियेवर नाट्य सादरीकरण.

फायदा: नैसर्गिक घटना लक्षात राहतात.

**३. इतिहास:**

उपक्रम: छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रकृती व अभिनय.

फायदा: इतिहासाची आत्मीयतेने समज प्राप्त होते. व अनेक कलांचा वापर आपल्याला अध्यापनात करता येतं मी इयत्ता सहावीचा मराठी विषय शिकवत असताना काव्य लेखन कलेचा वापर केला. विद्यार्थ्यांना काव्य लेखनासाठी एखादा विषय देऊन पाठ्यपुस्तकातील काव्यांशी साधर्म्य साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक कला कौशल्य विकसित झाली.स्वलिखित काव्य गायन सुद्धा विद्यार्थी करू लागले.

**विविध कला प्रकार व त्यांचा उपयोग:**

कलेचे वेगवेगळे प्रकार असून त्यांचा वापर वेगवेगळ्या विषयांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने करता येतो.हे आपण वरीलप्रमाणे पाहिले आहे. कला साधारणपणे पुढील प्रकारे असून ,त्यांचा वापर आपल्याला वेगवेगळ्या बाबींची पूर्तता करण्यासाठी होतो. ते प्रकार व उपयोग पुढील प्रमाणे सांगता येतील.

चित्रकला : दृश्य सादरीकरण, स्मरणशक्ती वाढवते

संगीत : भाषेचे सौंदर्य, ताल व लय समजते

नाट्यकला : संवाद कौशल्य,आत्मविश्वास

हस्तकला : बारीक काम, चिकाटी व सहकार्य

नृत्य : शारीरिक चपळता, अभिव्यक्ती

**मूल्यांकन पद्धती – कला एकात्मिक शिक्षणामध्ये मूल्यमापन**

**मूल्यांकना व मूल्यमापनाचे प्रकार:** प्रत्येक विषयाचे मूल्यांकन व मूल्यमापन वर्षभरामध्ये पुढील तीन प्रकारांनी केले जाते.

1. नैदानिक चाचणी (diagnostic test )

2 .आकारिक मूल्यमापन(formative evaluation )

3.संकलित मूल्यमापन(summative evaluation)

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– III (Special Issue – I) May – June, 2025

OPEN ACCESS Original Research Article

एखाद्या विषयातील एखाद्या घटकाचे कला एकात्मिक शिक्षणाच्या आधारे मूल्यांकन करण्यासाठी पुढील मूल्यांकनाच्या घटकांचा विचार केला जातो.

मूल्यांकनाचे घटक:

1 .ज्ञान व समज

2.सर्जनशीलता

3.सहभाग व प्रयत्न

4.संवाद कौशल्य

वरील घटकांच्या आधारे मूल्यांकन व मूल्यमापन करत असताना साधारणपणे मूल्यमापनाची खालील प्रमाणे साधने वापरली जातात .

साधने:- 1.निरीक्षण तक्ता

2.स्वमूल्यांकन

3 .सहमूल्यांकन

4 .प्रस्तुतीकरण

उदाहरण: कविता व चित्रकला उपक्रमाचे २० गुणांचे

**मूल्यांकन निकष:**

सर्जनशीलता – 5

समज – 5

सादरीकरण – 5

सहभाग – 5

**अंमलबजावणीतील अडचणी आणि उपाय योजना**

कला एकात्मिक शिक्षणाचा उपयोग इतर विषयांच्या अध्ययन-अध्यापनासाठी करत असताना अनेक फायदे होत असतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होत असते. वेगवेगळ्या मूल्यांची रुजवणूक होत असते. परंतु वेगवेगळ्या कलांचा वापर करत असताना शिक्षकाला काही समस्यांना सामोरे जावे लागते.साधारणपणे त्या समस्या पुढील प्रमाणे असू शकतात .

**समस्या:**

1.शिक्षकांना वेळ व प्रशिक्षणाचा अभाव

2.साधनसामग्री कमी

3.पालकांची मानसिकता

4.मुलांचा आत्मविश्वास कमी

कला एकात्मिक शिक्षणाचा प्रभावी वापर अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये होण्यासाठी तसेच शिक्षकांना येणाऱ्या अडचणी दूर होण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

1.शिक्षकांसाठी कार्यशाळा

2.वेळापत्रकात एकात्मिक उपक्रमांसाठी वेळ

3.स्वस्त व स्थानिक साधनांचा वापर

4.पालक संवाद कार्यक्रम

**उदाहरण:** साताऱ्यात एका शाळेत 'कलाकृतीचा दिवस' साजरा केला जातो .शिक्षकांनी गणित शिकवताना चित्रकलेचा वापर केला.

**शैक्षणिक धोरणे आणि NEP 2020 मधील कला एकात्मिक शिक्षणाचा संदर्भ:**

NEP 2020 मधील ठळक बाबी

1.अनुभवाधारित शिक्षण

2.सृजनशीलता आणि उपक्रमशीलतेला प्रोत्साहन

3.स्थानिक कला व संस्कृतीचा समावेश

**CBSE/NCERT मार्गदर्शक तत्त्वे:**

1 .प्रत्येक विद्यार्थ्याने दोन एकात्मिक प्रकल्प

2. शिक्षकांनी विषयांमध्ये कला मिसळावी

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XIV, Issues– III (Special Issue – I) May – June, 2025

OPEN ACCESS Original Research Article

**धोरणात्मक उपक्रम:**

1.समग्र शिक्षा अभियान

2.कला उत्सव (Kala Utsav)

3.राज्यस्तरीय बालनाट्य महोत्सव

**भविष्यासाठी दिशा:**

1.शिक्षक प्रशिक्षण

2.कला व तंत्रज्ञान युती

3.शाळा व स्थानिक कलाकार युती

**शिफारसी व निष्कर्ष:**

**शिफारसी:**

1.प्रत्येक शाळेने कला एकात्मिक धोरण तयार करावे.

2.शिक्षक प्रशिक्षण बंधनकारक करावे

3.शाळेतील वेळापत्रकात उपक्रमासाठी वेळ राखावा

4.स्थानिक कला व परंपरेचा समावेश करावा

**निष्कर्ष:**

कला एकात्मिक शिक्षण केवळ एक अध्यापन पद्धत नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे माध्यम आहे. इयत्ता सहावीमध्ये मराठी विषयांमध्ये कला एकात्मिक शिक्षणाचा वापर केल्यामुळे मुलांना शिक्षणात रस, समज व सर्जनशीलता ,सृजनशीलता निर्माण झाली.विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर काव्य लेखन केले.वेगवेगळ्या विषयांच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या त्यांची शब्द संपत्ती वाढीस लागली वेगवेगळ्या संकल्पनांची समज निर्माण झाली. बौद्धिक विकास होण्यास मदत झाली.भावभावनांचा विकास होऊन मानसिक विकास झाला.अनेक कवितांचा संग्रह होऊन,त्यातील निवडक विद्यार्थ्यांच्या स्वलिखित कवितांचे अंकुरले काव्य नावाच्या काव्यसंग्रहाचे पुस्तक प्रकाशित केले. जर शिक्षक, पालक व प्रशासन यांच्यात सुसंवाद साधता आला, तर प्राथमिक शिक्षण अधिक अर्थपूर्ण, आनंददायी आणि दीर्घकालीन परिणामकारक होऊ शकते.

**संदर्भ:**


1. *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020), भारत सरकार*
2. *CBSE Art-Integrated Learning Handbook, 2021*
3. *NCERT Learning Outcomes at Elementary Stage*
4. *NCF 2005 – राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा*
5. *UNESCO – Arts Education and Creativity Report, 2006*
6. *कला एकात्मिक शिक्षण संदर्भ मार्गदर्शक पुस्तिका – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (MSCERT)*
7. *विविध प्राथमिक शाळांमधील क्षेत्रभेटी व शिक्षकांशी मुलाखती (2023–24)*


*Cite This Article:*

*सौ. लंघे सं. सो. व डॉ. मिश्रा प्र. (2025). कला एकात्मिक शिक्षण.* **In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal**: **Vol. XIV (Number III, pp. 217–221).**